# परमार्थ - प्रकाश

अर्थात्

# श्रीदासराम—वचनामृत



संपादक

डॉ. के. वा. आपटे

सांगली
१९८७

प्रकाशक
श्री. य. के. आपटे

आवृत्ति पहिली

# परमार्थ - प्रकाश

अर्थात्

# श्रीदासराम—वचनामृत



संपादक
डॉ. के. वा. आपटे

सांगली
१९८७

प्रकाशक
श्री. य. के. आपटे

आवृत्ति पहिली

प्रकाशक
**श्री. य. के आपटे**
७९३, गावभाग,
सांगली

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

**प्रकाशन दिन :–**
माघ शुद्ध दशमी, शके १९०८
शनिवार दि. ७–२–१९८७

**मुद्रकः–**
**श्री. प. म. महाबळ**
प्रभा प्रेस, गणपती पेठ,
सांगली.

# अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रकाशकाचे हृद्‌गद | |
| श्रीदासराम महाराज फोटो | |
| उपोद्‌घात | |
| ज्योत पहिली | १ |
| ज्योत दुसरी | ६ |
| ज्योत तिसरी | १० |
| ज्योत चौथी | १७ |
| ज्योत पाचवी | २२ |
| ज्योत सहावी | २६ |
| ज्योत सातवी | ३० |

भगवान सद्‌गुरु श्रीदासराम महाराज
केळकर, श्रीक्षेत्र सांगली.



गोविंदस्य सुतं श्रेष्ठं हनुत्पादसेवकम् ।
इन्दिरानन्ददातारं रामं वन्दे परं गुरूम् ।।

— केशव

## — प्रकाशकाचे हृद्गद —

भगवान सद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी चिमडसंप्रदायाची मुहूर्तमेढ रोवली. त्यानी चिमड येथे आपले प्रिय शिष्य सद्गुरू श्रीरघुनाथ-प्रियसाधुमहाराज यांची समाधी बांधवून घेतली. गुरूद्वादशी ते पांडवपंचमी असा रथोत्सव सुरू केला. आमच्या चिमडसंप्रदायाचे आद्यप्रवर्तक सद्गुरू श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर हे श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराजांच्या पांडवपंचमीच्या रथोत्सवसोहळचात नैमित्तिक कीर्तन करीत असत. कधी ते आपले शिष्य सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस याना कीर्तन करायला सांगत. नंतर चिमडमहाराजांच्या आज्ञेने श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यानी सांगलीमध्ये इ. स. १९२४ पर्यंत २५ वर्षे नित्यकीर्तन केले. त्यानंतर श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या आज्ञेने त्यांचे शिष्य सद्गुरू श्रीमामा-महाराज केळकर यानी इ. स. १९२४ पासुन इ. स. १९६२ पर्यंत ३८ वर्षे नित्यकीर्तन केले. श्रीमामामहाराज केळकर यांच्या कीर्तनसेवेचा रौप्य-महोत्सव इ. स. १९४९ साली व त्रितपमहोत्सव इ. स. १९६० साली थाटाने साजरे झाले. त्यानंतर सद्गुरू श्रीदादा उर्फ श्रीदासराममहाराज यांनी इ. स. १९६२ पासून नित्य कीर्तनाला सुरवात केली. त्यांच्या नित्य कीर्त–नाला इ. स. १९८७ च्या माघ शुद्ध दशमीला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणजे सांगलीमध्ये हे नित्य किर्तन गेली ८७ वर्षे अखंड चालू आहे.

श्रीदादा उर्फ श्रीदासराममहाराज यांच्या कीर्तनसेवेला या माघ शुद्ध दशमी शके १९०८ ला २५ वर्षे पूर्ण होत आहेत, तेव्हा हा रौप्य–महोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने श्रीदादांचे कांही वाङमय प्रसिद्ध करावे अशी इच्छा झाली त्याप्रमाणे हे पुस्तक आज प्रकाशित होत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

श्रीदादांच्या कीर्तनाचे वैशिष्टच असे की त्यांच्या कीर्तन / प्रवचन निरूपणातून येणारे विषय हे आपल्याला बाहेर इतरत्र ऐकावयास मिळत

नाहीत. इतकेच नव्हे तर पुस्तकांतूनही वाचावयास मिळत नाहीत. तेव्हा हा परमार्थाचा अनमोल खजिना सर्व भक्तजनांना उपलब्ध व्हावा यादृष्टीने या पुस्तकात श्रीदादांच्या कीर्तन/प्रवचन/निरूपणातून येणारे विषय सुसूत्र करून मांडलेले आहेत. कारण सर्व विषय एका प्रवचनात /कीर्तनात / निरूपणात येऊ शकत नाहीत. श्रीदादांच्या कीर्तन / प्रवचनांची टाचणे इ. स. १९५१ पासून आजतागायत डॉ. के. वा. आपटे, श्री. व. म. बापट, सौ. गीतादेवी जोग, श्री. व्ही. के. कुलकर्णी, श्री. प्रकाश भावे इ. मंडळींनी घेतली आहेत व घेत आहेत. त्यावरुन त्यातील सारभूत असा गाभा या पुस्तकात एकत्र करून संपादित केला आहे.

संपूर्ण परमार्थशास्त्र वा साक्षात्कारशास्त्र यात सुसूत्रपणे आले आहे. सात ज्योतींमध्ये देव, विश्वाचा पसारा, प्रपंच–परमार्थ, संत–सद्‌गुरू, साधन, नाम व साक्षात्कार हे विषय साररूपाने आले आहेत. हयाचे हस्तलिखित श्रीदादांना दाखविले व त्याना ते फार आवडले. त्याना मी हे हस्तलिखित पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याची परवानगी मागितली व त्यानी आनंदाने अनुज्ञा दिली.

माझे वडिल डॉ. के. वा. आपटे यानी हे विषय सुसूत्र करण्याचे महत्वाचे काम केले त्यांचा मी कृतज्ञ आहे. श्री शिरूभाऊ सहस्त्रबुद्धे, श्री. आनंदराव सहस्त्रबुद्धे, श्री. धनंजय भावे, श्री. शिगाडे, श्री. व्ही. के कुलकर्णी, श्री. म वि. गाडगीळ यांना मी पुस्तक प्रकाशित करण्याची कल्पना बोलून दाखविली व त्याना ती फार आवडली. त्यानी या पुस्तक प्रकाशित करण्याच्या कामी वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य केले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. मुद्रिते तपासण्याचे किचकट काम श्री. चंद्रशेखर अण्णा, श्री. अनिलप्रभू, श्री. पां सो. गोखले, श्री. मुकुंदराव सहस्त्रबुद्धे, श्री वामनराव सहस्त्रबुद्धे इ. नी आपुलकीने केले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या मुद्रणाचे काम 'प्रभा प्रेस' या मुद्रणाल[य] फार चांगले केले आहे. सबब मुद्रणालयाचे सर्व कर्मचारी आणि मा[लक] श्री. प. म. महाबळ यांचा मी आभारी आहे.

भगवान सद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज व सद्‌गुरू श्रीदादा यां[च्या] कृपेने व आशिर्वादाने प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनाचे कार्य सुव्यवस्थित पार पडले, त्यांच्या चरणी साष्टांग दंडवत घालून हे हृद्‌गत संपवतो.

माघ शुद्ध दशमी<br>
शके १९०८<br>
दि. ७।२।१९८७ — य. के. आपटे<br>
सांगली.

# उपोद्घात

श्रीदासराममहाराजांच्या षष्टयब्दिपूर्तिनिमित्ताने त्यांच्या भक्त–मंडळीने काढलेल्या 'श्रीदासराम गौरव ग्रंथ' यात म्हटल्याप्रमाणे, श्री दादांनी श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या आशिर्वादाप्रमाणे आपल्या वयाच्या केवळ पाचव्या वर्षापासून भगवत्कीर्तन करण्यास सुरवात केली. वेळप्रसंगी पुढे ते प्रवचने करु लागले. तसेच वारकरी पद्धतीची निरुपणेही करु लागले. तसेच आपल्या भक्तमंडळींबरोबर त्यांची परमार्थ विषयांवर संभाषणेही होत असत. इ.स.१९६२ पासून तर श्रीदादांची नित्यकीर्तनेही सुरु झाली. या सर्वांमध्ये येणारे अभूतपूर्व विषय ऐकल्यावर त्यांच्या विवेचनाची टिपणे घऊन ठेवावीत असे काहींना वाटू लागले. त्यानुसार इ. स. १९५३ सालापासून आजतागायत त्यांनी सांगितलेल्या अध्यात्मविषयाची विस्तृत तसेच संक्षिप्त टिपणे अनेकाजवळ आजही आहेत. या विवेचनात परमार्थातील भिन्न विषयांवर श्रीदादांचे बोलणे होई. सर्वच विषय एकदम येणे शक्य नसे. पण एकेका विषयावरचे श्रीदादांचे विवरण सुसंगत पद्धतीने एकत्र करावे अशी कल्पना निघाली. तिचे प्रत्यक्ष रूप म्हणजे प्रस्तुतचा अमोलिक ग्रंथ. यामध्ये ईश्वर, विश्व, गुरु, इत्यादि विषयांवरचे त्यांचे विवरण येथे सुसंगतपणे व संक्षिप्तपणे मांडलेले आहे.

# – ज्योत पहिली –

## देव

आपण आजूबाजूचे विश्व, दृश्य पहात असतो. परंतु आपण स्वतःला मात्र पाहू शकत नाही. विश्वाप्रमाणे देव हा काही दृश्य नाही देव दिसत नाही म्हणून देव नाही असे आपण म्हणतो. आता, आपण स्वतःस पाहू शकत नाही; म्हणून आपण नाही, असे मात्र कधीच म्हणत नाही. 'मी नाही' असे कुणीच म्हणत नाही. पण देव नाही असे आपण म्हणत रहातो. का ? जगात देव नाही ? तसे नाही. खरे म्हणजे देव आहे. आणि देव नाही हीच भ्रामक कल्पना आहे.

देव म्हणजे चैतन्य. परमेश्वर म्हणजे चैतन्य. चैतन्य म्हणज ज्योत आहे; तिलाच आत्मज्योति म्हणतात. चैतन्य म्हणज आत्मा. आत्मा वायुरूप आहे. वायूचा प्रकाश म्हणजेच आत्म्याचा प्रकाश. आत्मा, देव वायुरूप आहेत. म्हणून 'वाराचि देव आमुचा' असे म्हटलेले आहे. परमात्मा, वायु, प्रकाश हे वेगळे नाहीत. देव म्हणजे चैतन्य, आत्मा, परमात्मा, ब्रह्म, परब्रह्म, ईश्वर, परमेश्वर, सच्चिदानंद वायु असे म्हणता येते. संतांच्या वाङ्मयात हे सर्व शद्ब समानार्थी वापरले जातात.

## चैतन्य

देव म्हणजे चैतन्य. चैतन्य हे स्पंदरूप आहे. स्पंदाच्या एका बाजूला चैतन्य आहे तर दुसरीकडे जड आहे. जड व चैतन्य हे तसे दूर नाहीत; ते दोन्ही एकमेकाला सोडून नाहीत; ते दोघे एकाच तत्त्वाला अंगभूत आहेत. ते दोन्ही मिळून एकच तत्त्व असल्याने अद्वैत आहे

चैतन्यामुळे जड बनले आहे. जडाला स्वतंत्र अस अस्तित्व नाही. चैतन्यातूनच जडाची उत्पत्ति होते. तथापि जडाशिवाय चैतन्याचे अस्तित्व

दाखविता येत नाही. चैतन्य हे वायुस्वरूप आहे तर जड हे घनरूप आहे. चैतन्याच्या कक्षेत जड आले की जड हलायला लागते. चैतन्यातून जड निर्माण होते; जडातून चैतन्य निर्माण होत नाही.

चैतन्यात जड आहे का ? नाही. जडात चैतन्य आहे का ? आहे. जड व चैतन्य हे एकच आहेत काय ? नाहीत. जडाशिवाय चैतन्याला अस्तित्व आहे का ? आहे. मात्र चैतन्याशिवाय जड नाही. चैतन्यापासून जड आहे पण चैतन्य जडात मिसळत नाही. चैतन्याशिवाय जड काही करू शकत नाही. म्हणून जडापेक्षा चैतन्य महत्वाचे आहे.

चैतन्यातून निघालेल्या जड विश्वात संघटन व विघटन चालू आहे. पण ज्या चैतन्याच्या अधिष्ठानावर ते चालु आहे, ते चैतन्य मात्र घटित नसून अघटित आहे. चैतन्य आहे तसेच रहाते. जगाच्या आरंभीही चैतन्य, शेवटालाही चैतन्य, मग मध्ये काय ? चैतन्यच. सर्व विश्व नाशवंत आहे. परंतु चैतन्य सतत टिकून रहाणारे आहे. चैतन्य हे अमृत आहे, त्याला नाश नाही. दृश्य नष्ट झाले तरी चैतन्य असतेच.

चैतन्याला आकार नाही आणि विकारही नाही. ज्यात काही फरक पडत नाही ते चैतन्य. काही असो वा नसो चैतन्य हे आहेच आहे. चैतन्यात वैचित्र्य नाही; ते शाश्वत व एकरुप आहे. या जगांत फक्त चैतन्य सत्य आहे. चैतन्याखेरीज इतर सर्व असत्य आहे. चैतन्य नाही असे स्थानच नाही. किडामुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत चैतन्य म्हणजे स्पंद आहे. चैतन्याला अंत नाही.

## ब्रह्म, परब्रह्म

ब्रह्म हे सच्चिदानंद आहे. सच्चिदानंद म्हणजे सत्, चित्, आनंद किंवा अस्ति, भाति, प्रिय. एकनाथमहाराज म्हणतात ' सत्पद ते ब्रह्म चित्पद ते माया। असिपदी जया म्हणती हरी.' सच्चिदानंदाचे स्पष्टीकरण



चिमडसंप्रदायाच्या प्रवर्तक रामभाऊमहाराज यरगट्टीकरांनी असे केले आहे: ' सद्रूप मूळ ब्रह्म पाही। चिद्रूप गगनी नटला बाई। आनंदरूप ते लवलाही। गुरुघरचे नाणे ।।' सत् म्हणजे अस्तित्व. सत्चा विलास म्हणजे चित्. अस्तित्व व चैतन्य असले की आनंद होतो म्हणून सत् अधिक चित् बरोबर आनंद. चैतन्य व आनंद असल्यास अस्तित्व असलेच पाहिजे. म्हणून चित् अधिक आनंद बरोबर सत्. सत्ला आनंद असेल तर तेथे चित् असलेच पाहिजे. म्हणून सत् अधिक आनंद बरोबर चित्. सत् म्हणजे अस्तित्व हे चित्ने म्हणजे चैतन्याने नटलेले आहे म्हणूनच तेथे आनंद आहे.

अस्तित्व हे सूक्ष्म व अदृश्य असते. चित् हे चंचळ असते. गति आणि प्रवाह यांत जो फरक आहे तोच अस्तित्व व चैतन्य यांत आहे. गतीमुळे प्रवाह असतो; प्रवाहाला स्वतंत्र अस्तित्व नाही. अस्तित्व प्रवाही झाले की तेच चैतन्य. अस्तित्व हे लहरी-युक्त असते, तर चैतन्य हे प्रवाही असते.

सत् ब्रह्म हे शब्दाच्या पलीकडे आहे; ते शब्दांत व्यक्त करता येत नाही. मर्यादित वस्तु शब्दांनी सांगता येतात. ब्रह्म हे अमर्यादित आहे असेही म्हणता येत नाही; कारण तेही आपल्या बुद्धीला काहीतरी जाणीव करुन देते. ब्रह्म हे शब्दांनी व्यक्त करता येत नसल्यानें, त्याला ' नि:शब्द ' म्हणतात. तथापि शब्दांत सांगितल्याशिवाय काहीच कळणार नाही. परंतु शब्द आला की भेद आला. म्हणून सर्व ब्रह्म ते नि:शब्द। भेदाभेद चिदानंद' असे म्हटले आहे. चित्चा गुण चंचलपण आहे. चंचलपण आले की शब्द आलाच.

जगातील प्रत्येक पदार्थाला अवस्थांतर, स्थित्यंतर व रूपांतर आहे. तसे ब्रह्माला नाही. ब्रह्म हेच फक्त सत्य आणि नित्य आहे. विश्वाला उत्पत्ति, स्थिति व लय आहे. ब्रह्माला जन्मही नाही व मरणही नाही. ब्रह्म हे एक आहे. एक म्हणजे काय ? जे दोन नव्हे ते. असे एक ब्रह्मच आहे.

ब्रह्म म्हटले की माया आली. ब्रह्माइतकीच माया आहे. जितकी रज्जु तितका सर्प. जितका खांब तितका पुरुष. तसे जितके ब्रह्म तितकी माया आहे. ब्रह्म म्हणजे माया आहे. ब्रह्म निश्चळ आहे. निश्चळ म्हणजे ज्यातील चंचलत्व फार फार फार सूक्ष्म आहे: ब्रह्म हे मूळ तत्त्व स्पंद आहे. त्यात एका बाजूस ब्रह्म तर दुसऱ्या बाजूस माया आहे. भूमितीतील लांबी, रुंदी, जाडी/खोली नसलेल्या बिंदूप्रमाणे ब्रह्म आहे तर बिंदूने होणाऱ्या रेषेप्रमाणे माया आहे.

## आत्मा, परमात्मा

आत्मा आहे. परंतु 'मी जिवंत आहे' हे सिद्ध करा म्हणण्यासारखच आत्म्याचे अस्तित्व सिद्ध करा हे म्हणणे आहे. आत्म्याचे अस्तित्व हे प्रयोगशाळेत सिद्ध करता येणार नाही. अस्तित्व म्हणजेच आत्मा. प्रत्येक वस्तूला अस्तित्व आहे असे आपण म्हणतो. ते अस्तित्व म्हणजेच आत्मा. आत्मा प्रयोगी आहे; त्याच्यावर प्रयोगशाळेत कसा प्रयोग करणार? आत्म्यामुळे प्रयोग होतील पण आत्म्यावर प्रयोग होणार नाहीत.

जडाला चालविणारे चंचल आहे. चंचलाला चालविणारा तो चिन्मय. चिन्मयाला चालविणारा तो आत्मा. आत्मा हा जडापेक्षा वेगळा आहे दृश्यापेक्षा वेगळा आहे. आत्मा निश्चळ, 'गुप्त ना प्रगट' असा आहे जगाच्या उदयापासून अंतापर्यंत ज्याचा उदयच आहे पण अस्त मात्र नाही तो आत्मप्रकाश आहे. आत्मा सतत आहे; तो प्रकाशरुप आहे; हा प्रकाश निळा आहे. परमात्मा निळा आहे.

परमात्मा हा अखंड अस्तित्वात आहे. तो सगळीकडे भरला आहे. तो नाही अशी जागाच नाही. सर्व वस्तूत आत्मवस्तु आहे. परमात्मा सगळ्यात आहे परंतु तो कशातही सापडलेला नाही.



परमात्मा हा विज्ञानस्वरूप आहे. विज्ञान म्हणजे ज्ञान व अज्ञान यांनी रहित अशी स्थिती. परमात्मा हा अक्षर, निरुपाधिक आहे. तो सगुणही आहे व निर्गुणही आहे.

परमात्मा वायुस्वरूप आहे. आपल्याला स्पर्शाने कळणारा, बाहेर कळणारा आपल्या परिचयाचा वारा हा जड आहे; तो परमात्मा नव्हे. ज्या वाऱ्याचा निर्गुणात पसारा आहे तो वारा म्हणजे परमात्मा. परमात्मा हा सच्चिदानंदवायुस्वरूपी आहे.

## देव, ईश्वर, परमेश्वर

सच्चिदानंदवायुस्वरूपी परमात्मा म्हणजे देव, ईश्वर, परमेश्वर. हा देव म्हणजे 'भीषास्मात् पवते वायुः भीषोदेति सूर्यः। भीषास्मादग्निश्चेन्द्रश्च मृत्युर्धावति पंचमः' असा आहे. विश्वात जी काही हालचाल दिसते ती सर्व परमेश्वराच्या सत्तेने आहे. सर्व काही देव करतो. पण याचा विपर्यस्त अर्थ सामान्य लोक घेतात. त्याचा खरा अर्थ असा: सर्वत्र देव आहे. त्याच्या अधिष्ठानावर आपले कर्तृत्व आहे. म्हणून सर्व काही देव करतो असे म्हटले जाते.

# ~ ज्योत दुसरी ~

## विश्वाचा पसारा

विश्वाच्या मागचे मूलतत्त्व वायु. चैतन्य,[१] किंवा आत्मा आहे. त्यापासूनच विश्वाचा पसारा झाला आहे.

## वायु

वायु हाच जगाच्या उत्पत्ति, स्थिति, लय यांचे कारण आहे. हे दृश्य विश्व म्हणजे काय आहे ? वायूच्या लहरींची विशिष्ट स्थिति म्हणजे दृश्य. चिद्वायूच्या लहरींनी रुपयाच्या चवडीप्रमाणे विश्व बनले आहे. विश्वाची उत्पत्ति, स्थिति व नाश हा सर्व वायूचा खेळ आहे.

## चैतन्य

चैतन्याचा खेळ म्हणजे विश्व. चैतन्याच्या ठिकाणी विश्वाची स्फूर्ति आहे; म्हणून चैतन्यातून विश्व. चैतन्याचा विलास म्हणजे विश्व. चैतन्य म्हणजे स्पंदन आहे; ते जगाच्या बुडाशी आहे. स्पंदनामुळे विश्वाचा पसारा निर्माण झाला. आणि चैतन्य सर्वांत भरून राहिले. मुंगीपासून ब्रह्म–देवापर्यंत, आणि दगडापासून अनंत विश्वापर्यंत स्पंदन आहे. स्पंदाचा विस्तार म्हणजे विश्व. स्पंद या केंद्रबिंदूतून विश्वाचे वर्तुळ निघाले आहे

## आत्मा, परमात्मा, परमेश्वर

आत्मा वायुरूप आहे. दृश्य म्हणज आत्म्याचा विलास, आत्म्यावर उठणाऱ्या लहरी. परमात्मा सच्चिदानंद आहे. तेथे चित्‌मुळे चंचळपण येते.

१ संपादकाची टीप : मागे मूलतत्त्वाला अनेक नावे आहेत असे सांगितले होते. त्याला धरून विश्वाचा पसारा सांगताना त्यातील काही नावांचा निर्देश येथे झाला आहे.



जेथे चित् असते तेथे दृष्टि असते. आत्म्याची निर्हेतुक दृष्टि एका बिंदूवर पडते त्याला शून्य म्हणतात. जसे कित्येकदा आपली नजर कुठेतरी असते पण आपण काय पहात आहोत हे मात्र कळत नाही. तसे चित्‌मुळे परमात्म्याची दृष्टि ज्या एका बिंदूवर पडते त्याला केवलशून्य म्हणतात बिंदु अथवा शून्य म्हटले की तेथे लहरी आल्या. परमात्म्याची केवल वा सहज दृष्टि जेथे पडली त्या शून्यातून लहरी उत्पन्न होतात. त्यांतून पुढे प्रस्फुट गगन निर्माण होते. तेथे शीत आणि उष्ण आभा निर्माण होऊन आकाश उत्पन्न होते. 'शब्द जो राहिला नादाते गिळोन' म्हणजे गगन किंवा आकाश. या आकाशातून पंचमहाभूते उत्पन्न होतात आणि पंच महाभूतापासून सर्व जडसृष्टि निर्माण होते. आकाशावर प्राणाचा आघात झाला की सर्व ब्रह्मांडाची उत्पत्ति होते. आकाश म्हणजे शून्य आणि प्राण म्हणजे वायु म्हणून विश्व म्हणजे 'सर्व शून्याचा विस्तार' असे म्हटलेले आहे

परमेश्वर सच्चिदानंदरूप आहे. तो नुसता सत्–आनंद असता तर हे विश्व निर्माण झाले नसते. परमेश्वरातील चित्‌मुळेच विश्वाची उभारणी होते. चित्‌चा धर्म हालचाल. चित् अशा परमात्म्यापासून लहरी उत्पन्न होतात. यांतील एक लहर उष्ण असते. या उष्ण लहरींच्या पोटातच एक शीत लहर असते. या लहरींचे प्रवाह असतात. या प्रवाहामध्ये जी पोकळी असते, तिला तेथे चैतन्य असल्यामुळे चिदाकाश म्हणतात. पुढे या चिदा–काशातून प्रस्फुटगगन निर्माण होते. प्रस्फुटगगनातून शब्द हा गुण असणारे भूताकाश उत्पन्न होते व पुढे जगाचा पसारा उत्पन्न होतो.

मुळात सत् आहे. त्यामधून दोन गति निर्माण होतात. या दोन गति जेथे एक होतात ते केवलशून्य. या केवलशून्यातून शिवात्मशून्य, शिवात्म-शून्यापासून प्रस्फुटगगन होते. प्रस्फुटगगन म्हणजे अशब्द स्थिति. प्रस्फुट गगनातून दोन तेजोगति निर्माण होतात व पुढे भूताकाश, मग वायू, तेज, इत्यादि क्रमाने विश्वोत्पत्ति होते.

## जग खरे की खोटे ?

कुणी जग खरे मानतात तर कुणी खोटे मानतात, आम्ही त्याला खरेही मानत नाही वा खोटेही म्हणत नाही. आम्ही म्हणतो जग आहे तवर आहे; ते सतत टिकणारे नाही; ते आज ना उद्या जाणार आहे; ते नाशवंत आहे,

## विश्वातील जीव

विश्वोत्पत्तीच्या प्रक्रियेत 'आकाश वायूची पडली जे गाठी। आत्म हृदयपुटी सामावला', असे घडले. आकाश व वायु यांची मिळणी झाली की आत्मा देहात प्रवेश करतो व जीव होतो.

मूळ परमात्मा विज्ञानस्वरूप आहे. परमात्म्याच्या ठिकाणी 'अहं बहु स्याम्' अशी प्रेरणा झाली व विश्वोत्पत्ति सुरु झाली. आणि मग चैतन्य जेव्हा जडाच्या उपाधीत सापडले, तेव्हा ते अज्ञानाच्या उपाधीने जीव आणि साक्षि चैतन्य स्वरूपाने म्हणजे ज्ञानाच्या उपाधीने शिव म्हटले जाऊ लागले. जीव हा पिंडाशी, देहाशी संबंधित आहे तर शिव ब्रह्मांडाशी संबंधित आहे.

विश्व हे आकाशातून उत्पन्न होते. आकाश म्हणजे शब्द. हा शब्द ज्यातून उत्पन्न होतो ते अशब्द म्हणजे प्रस्फुटगगन. या अशब्दाच्या पलीकडे शब्दाशब्दरहित स्थिती आहे. तिच्या पलीकडे मन, बुद्धि, अहंकार, जीवात्मा, शिवात्मा आणि शिवात्मशून्य आहेत. शिवात्मशून्य म्हणजे जेथे जीव आणि शिव हे दोन्हीही लीन होतात, ते ठिकाण. हे शिवात्मशून्य वायूच्या दोन गतीतून निर्माण झाले आहे. आणि या गति परमात्म्यातून – आनंदस्थानातून उत्पन्न झाल्या आहेत. आनंद हे परमात्म्याचे मूळ स्वरुप आहे. आनंदरूप परमात्म्यातून वरील क्रमाने स्थित्यंतरे होत होत जीव सध्याच्या सुख–दुःखांनी भरलेल्या स्थितीत आलेला आहे. आणि प्रत्येक जीवाला दुःख नको



असते, आनंद पाहिजे असतो, याचे कारण हेच की जीवाचे मूलभूत खरे स्वरुप आनंद आहे.

जीव हा परमात्म्याचाच उपाधीत सापडलेला भाग. सूर्यापासून ज्याप्रमाणे पृथ्वी वगैरे ग्रह दूर फेकले गेले, त्याप्रमाणे परमात्म्यापासून जीव दूर फेकले गेले. जीवाला जी गती प्राप्त झाली त्या गतीतून उपाधि निर्माण झाली आणि जीव उपाधीत सापडला. आणि तो आपल्या मूळस्वरूपाला विसरुन गेला; तो आपले स्वतःचे मूळ स्थान विसरला.

आता, जर जीवाला जीवपणाचा वियोग घडला, जर त्याची उपाधि दूर झाली तरच त्याचा पुनः परमात्म्याशी योग घडणार आहे. अज्ञानाचा लय होऊन जीव हा शिवस्वरूप झाल्यावर, ज्ञान या उपाधीचाही निरास होऊन जीव हा परमात्मरूप होणार आहे. ते साधणे हे मानवी जीवनाचे साध्य आहे. त्यासाठी परमार्थातील सद्गुरूंनी सांगितलेली नामसाधना जीवाने करावयास हवी.

# ज्योत तिसरी

## प्रपंच व परमार्थ

चैतन्यापासून जड विश्व झाले. आणि जगात जडदेहाच्या उपाधीत सापडून चैतन्य जीवदशेला आले अज्ञानाने देहाशी तादात्म्य झाल्याने जीवाला जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्था आल्या. या अवस्था जरी चैतन्यामुळेच आहेत तरी जीवाला त्यांतील चैतन्याची जाणीव येत नाही. तथापि जीव हा आनंदरूप परमात्म्याचा भाग असल्याने, तो या जगात आनंद शोधीत असतो. परंतु त्याला निर्भेळ सुख वा आनंद मिळत नाही.

## चैतन्यात खरें सुखसमाधान

प्रस्तुत जीवनात जीवाचे शरीराशी तादात्म्य झाल्याने, जीवाला बाहेरील जगाचे, दृश्याचे आकर्षण वाटते. त्यामुळे आपण सर्व जीव बाह्य पाच विषयातून सुख घेण्याचा प्रयत्न करतो. पण त्यातून मिळणारे सुख निर्भेळ नसते व ते कायम टिकत नाही. सुखाला दुःख चिकटलेले असल्याने ते निर्भेळ नाही. बाह्य विषय बदलते आहेत; त्यामुळे त्यांतून मिळणारे सुख सातत्याने टिकत नाही. बाह्य विषय पाच महाभूतांनी बनलेले आहेत. आणि आपली सुखाची भिस्त या पाच 'भुतांवर' आहे. जगातील वस्तूतून सुख घेण्यास आपण अनेक खटपटीलटपटी करतो. घरदार, बायकामुले इत्यादि पसारा वाढवतो. मी–माझे असे म्हणत रहातो. अहंकाराने केलेल्या कर्मांनी पुनःपुनः जन्ममरण येते. आणि या जन्ममरणचक्रात म्हणजे संसारात आपल्यामागे सुखदुःखपरंपरा लागते. संसारात आपल्या क्रिया मर्यादित, सापेक्ष व अहंकारपूर्वक असल्याने दुःख सुटत नाही आणि जे सुखसमाधान मिळते ते क्षणभंगुर व तात्कालिक असते.

आपणास खरे शाश्वत सुख हवे असेल तर 'पाच भुतांना' सोडले पाहिजे, जडाचे तादात्म्य कमी केले पाहिजे. शाश्वत सुखासाठी चैतन्याकडे



वळले पाहिजे चैतन्यातील सुखसमाधान सतत टिकणारे आहे चैतन्याच्या स्मरणात अखंड सुखाची प्राप्ति आहे आपल्या देहातील चैतन्याकडे लक्ष देऊन, त्याच्याशी तादात्म्य होऊन, अखंड सुख मिळवावयाचे आहे. शरीर व दृश्य बाजूला केल्याशिवाय चैतन्य कळत नाही व त्याच्याशी तादात्म्य होत नाही. म्हणून देह व दृश्य बाजूला सारुन, चैतन्याशी होणाऱ्या तादात्म्याने खरे सुख मिळणार आहे. आणि चैतन्याचा अनुभव प्रथम आपण आपल्या देहातच घ्यावयाचा आहे.

आपल्या शरीरातील श्वासोच्छवास ही परमेश्वराने दिलेली अमोलिक देणगी आहे. श्वासोच्छवासात म्हणजे उपाधिभूतजीवनात जड व चैतन्य सांधलेले आहे. श्वासोच्छवासावरून आत्म्याचा, चैतन्याचा मागोवा घ्यावयाचा आहे. जीवन म्हणजे चैतन्य हे शरीरापेक्षा, जडापेक्षा भिन्न आहे. चैतन्याचा अनुभव घ्यावयाचा असेल तर जड बाजूला केले पाहिजे, जडाकडे असणारी मनाची ओढ चैतन्याकडे वळविणे आवश्यक आहे. जडाच्या योगाने चैतन्याची अनुभूति येत नाही. शरीरात जीवनाची, चैतन्याची जी अनुस्यूत क्रिया चालली आहे तोवर लक्ष राहिले तर चैतन्याचा अनुभव येतो. चैतन्य हे साधनाच्या अभ्यासाने, गुरूकृपेने दृग्गोचर होते. चैतन्याच्या स्मृतीसाठी परमार्थ आहे; चैतन्याच्या स्मृतीत जीव आला की परमार्थ, परमार्थामध्ये चैतन्याचा अनुभव घ्यावयाचा आहे, चैतन्य हे परमार्थाचे साध्य आहे.

## प्रपंचात राहून परमार्थ

परमार्थ हा संसारात, प्रपंचात राहून करावयाचा आहे. संसार कुणाला ही सुटलेला नाही. म्हणून 'संसारात राहून परमार्थ करावा' असे संतांनी सांगितले आहे. कारण त्यांना माहीत आहे की जीव आज ना उद्या संसाराला विटून परमार्थात येईल.

वास्तविक परमार्थ हा संसारापासून भिन्न नाही. संसारातील क्रिया निरपेक्ष झाल्या म्हणजे परमार्थ होतो. संसारातील अहंकाराची भावना गेली की तोच परमार्थ होतो. संसारात विषयांविषयी जितकी आवड असते तितकीच आवड जर परमेश्वराविषयी निर्माण झाली तर तोच परमार्थ. म्हणून संसार हा परमार्थस्वरूप आहे असे संत म्हणतात.

तथापि संसार करुन परमार्थ करता येतो ही फक्त गोड भाषा आहे. संसार व परमार्थ हे सव्यसाचित्वाने होणे हे अत्यंत अवघड आहे; खरे म्हणजे दोन्ही एकदम जमत नाहीत. दोन्ही सव्यसाचित्वाने देवाने करवून घेतले तरच शक्य आहे.

## परमार्थ म्हणजे काय ?

परमार्थ म्हणजे परम अर्थ, मोठा अर्थ. साधुसंतांनी ज्या मोठ्या अर्थाची सिद्धता, प्राप्ति करुन घेतली, त्याला परमार्थ म्हणतात. संतांनी आत्मप्राति, ब्रह्मसाक्षात्कार, अथवा चैतन्याची अनुभूति करुन घेतली. आत्मज्ञानाशिवाय, जीवाशिवाची भेट झाल्याशिवाय जन्ममरणातून सुटका नाही. जन्ममरणातून सुटका म्हणजे मोक्ष. परमार्थ हा मनाला परमार्थमय करुन टाकतो व मुक्तीचा लाभ होतो. वाऱ्यात वारे मिसळवून टाकणे म्हणजे मोक्ष. वायूची लहर वायूत मिसळवणे म्हणजे परमार्थ. परमार्थ म्हणजे जीवाने शिवाला पहाणे. चैतन्याने चैतन्याद्वारा चैतन्याशी तादात्म्य होऊन चैतन्याची अनुभूती घेणे हाच परमार्थ. आत्मानुभूति, जीवाने शिवरूप होणे हेच मानवी जीवनाचे ध्येय आहे. आणि हे ध्येय साध्य करुन घेण्यास जे जे करावे लागते ते परमार्थ. देवपूजा, श्रवण, कीर्तन इत्यादि परमार्थाला पूरक आहेत. चित्त - चैतन्याचे एकीकरण होणे ही गोष्ट परमार्थात सर्वात महत्वाची आहे. परमार्थात कोणतीही गोष्ट करताना चैतन्यावर लक्ष असणे महत्वाचे आहे.



## परमार्थ कसा आहे ?

पमार्थ हा आपल्या नेहमीच्या व्यवहारापेक्षा भिन्न आहे. जीव-शिवाचे ऐक्य होण्याच्या कृतीचा अभाव म्हणजे व्यवहार, याउलट जीवाने शिवरूप होणे हा परमार्थ आहे. मनाचे तादात्म्य शरीराशी राहून जे जे घडेल ते ते व्यवहारात जमा होतो; तेच तादात्म्य चैतन्याशी राहून जे घडेल तो परमार्थ. परमार्थ हा शरीराला बाजूला ठेऊन करावयाचा आहे, देहाचा परमार्थाशी अर्थाअर्थी संबंध नाही; परंतु तो परमार्थाला आवश्यक आहे; कारण देह नसेल तर परमार्थ साधता येणार नाही, चैतन्याचा अनुभव घेता येणार नाही. तथापि परमार्थ शरीराला सुटून आहे. जोपर्यंत शरीराला सोडण्याची आणि दृश्याला टाकण्याची आपली तयारी नाही, तोपर्यंत परमार्थ करता येणार नाही.

आपली कल्पना असते की परमार्थ हा भाविकांचा गोंधळ आहे. पण ही कल्पना चुकीची आहे. परमार्थ खोटा नाही; तेथे घातपात नाही. परमार्थात भय नाही, दुःख नाही. परमार्थात ज्ञान आहे, निखळ आनंद आहे, सर्व काही आहे.

परमार्थ हे अनुभवाचे प्रात्यक्षिक शास्त्र आहे. परंतु इतर शास्त्राप्रमाणे परमार्थाला–आत्मसाक्षात्काराला– बाह्य उपकरणे नाहीत. आत्मा स्वयसिद्ध असल्याने ज्ञानाने त्याचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही. परमार्थाची साधने हृदयात आहेत व अनुभव सहस्त्रदळात आहे. त्याची विशिष्ट अवस्था कंठात आहे. शरीरातील श्वासोच्छवासात नाम आहे, उच्चार आहे, व त्यांचे स्थान कंठात आहे. नाम घ्यायचे आहे अंतकरणाने. तसेच स्थळ, काळ, परिस्थिती इत्यादि कशाचेही बंधन परमार्थाला नाही. शरीरातील नाद व प्रकाश यांवरुन अदृश्य असणाऱ्या आत्म्याचे अस्तित्व कळून येते.

परमार्थात एक महत्त्वाचे वर्म आहे: कोणीही व कसाही जीव असो, त्याने परमार्थात पाऊल टाकले की तो कडेला जायलाच पाहिजे.

# परमार्थ कुणासाठी ?

आत्मसुख घेणे हा प्रत्येक जीवाचा जन्मसिद्ध हक्क आहे. प्रत्येकाला परमार्थात प्रवेश आहे; परमार्थात मज्जाव कोणालाच नाही. परमार्थातील पहिली पाटी ' सकळांसी येथे आहे अधिकार ' अशी आहे. परंतु परमार्थ हा ऐच्छिक विषय आहे. त्यामुळे लगेच पुढे दुसरी पाटी ' कोणी व्हा रे अधिकारी ' अशी आहे. कारण नसताना कोणी परमार्थाकडे वळत नाही. प्रपंचाला वैतागला म्हणजे जीव परमार्थात येतो. संसारात सुखाभास आहे हे ज्याला कळेल, तोच परमार्थाकडे वळेल. ज्याच्या पोटात दुखते आहे तोच ओवा मागेल. जो त्रिविध तापाने पोळला आहे तोच परमार्थाचा अधिकारी होईल. तसेच, सर्वांना खरा परमार्थ मिळतो असे नाही. ज्याची वेळ आली असेल त्यालाच मिळतो.

# परमार्थाला आवश्यक गोष्टी

परमार्थात आपली प्रगति व्हावी असे ज्याला वाटते त्याला काही नियम पाळावे लागतात. त्याला परमार्थप्राप्तीची तळमळ हवी. परमार्थाचे असे आहे की पुष्कळ प्रयत्न केल्यास उगीच थोडा परमार्थ साधतो. परमार्थाची प्राप्ति विनासायास, बिनकष्टाने होत नाही. परमार्थाला निरहंकारी वृत्ति पाहिजे. परमार्थाला मन मोकळे हवे. परमार्थी जीवाने आहे त्यात समाधान मानले पाहिजे. धीर असेल तर परमार्थ साधेल; येथे तातडी चालत नाही. परमार्थासाठी मनाची व बुद्धीची निश्चिति पाहिजे. प्रपंच हा परमार्थाकरता आहे, निर्विषयी होण्यासाठी विषय आहेत अद्वैतप्राप्तीसाठी द्वैत आहे, आत्मानुभूतीकरता देह आहे, हे जाणून घ्यावयास हवे. परमार्थाच्या वाटेवर आकर्षणे आहेत; त्यांत न गुंतणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. परमार्थ करणाऱ्या माणसाला मोहाचे प्रसंग फार येतात, त्यांत जीव गुरफटला तर त्याचा परमार्थ संपला; त्यांतून निभावयास हवे. परमार्थात अत्यंत तोल [संभाळून वागावे लागते लागतो



परमार्थात एकनिष्ठेला फार महत्त्व आहे; ती डळमळली की परमार्थावर पडदा पडलाच. परमार्थात साधकाच्या भूमिकेत कमर पडता कामा नये. आत्मसाक्षात्कार व्हावा अशी आच ज्याला असेल त्याला परमार्थ जमतो. परमार्थाची आस्था असल्याविना त्याचा अभ्यास होणार नाही, परमार्थाला शुद्ध सात्त्विक गुणच उपयोगी आहे; तीन गुणांना परमार्थाच्या दृष्टीने किंमत शून्य. मनाचा अभाव झाल्याशिवाय परमार्थ होत नाही. सद्गुरूंनी दाखविलेल्या वाटेवरून वाटचाल ही ज्याची त्याला करावी लागते. परमार्थात आपण जे करतो त्याचे मुद्दाम प्रदर्शन करू नये. आपला परमार्थ झाकून असावा.

# परमार्थातील प्रवेश व प्रारंभ

परमार्थ हा तसा सोपा आहे, जर त्यात प्रवेश झाला तर. प्रथम प्रवेश होणेच महाकर्म कठीण आहे. सद्गुरुचा अनुग्रह म्हणजे परमार्थात शिरण्याचे तिकिट आहे. आत्मज्ञानाची प्राप्ति गुरुकृपेशिवाय नाही; चैतन्याचा अनुभव घ्यायचा असेल तर चैतन्याचे माध्यम सापडले पाहिजे; त्यासाठी सद्गुरुंची गाठ पडावयास पाहिजे, त्यांची कृपा व्हायला पाहिजे. परमार्थाची सुरवात गुरुकृपेने होते

'नाम श्वासोच्छ्वाची असे। परब्रह्म तेथे वसे' हीज्ञानावस्था परमार्थाचे प्रवेशद्वार आहे. नाकाला सूत लागण्याची अवस्था जिवंतपणी येणे येथूनच खऱ्या परमार्थाला प्रारंभ होतो. चैतन्याच्या माध्यमात चित्ताची एकाग्रता झाल्यावर जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्थांचा निरास होऊन, उन्मनी अवस्था प्राप्त होते. ज्याठिकाणी मनाचे कार्य संपते ती उन्मनी. या उन्मनी अवस्थेपासूनच परमार्थाच्या खऱ्या वाटचालीला सुरवात होते.

# परमार्थाचा अनुभव देहात

परमार्थाचा अनुभव प्रथम आपण आपल्या देहात घ्यावयाचा आहे, तथापि बटन दाबले की उजेड अशी झटपट प्रचीती परमार्थात नाही.

बुद्धीची अस्थिरता, मनाची चलबिचल आणि चित्ताची धावपळ म्हणज परिभ्रमण. हे परिभ्रमण थांबले की अनुभव यायला पाहिजे.

चैतन्याचे माध्यम सापडले तरच ब्रह्मरुप होता येते. चैतन्याचे माध्यम शरीरात आहे. श्वासोच्छवासात श्वसनाची गति, नामाची गति, व प्राणाची गति आहे. प्राण हा जीव-शिवांचा दुवा आहे. नाम म्हणजे चैतन्य; नामाचा – चैतन्याचा – ध्वनि सहज आहे. परमार्थात नादानुसंधानामध्ये रहाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्या नामगतीवर लक्ष ठेवल्याने परमार्थातील अनुभव येतात.

देहातील सहस्त्रदळस्थानात परमार्थाचा अनुभव आहे. येथे जी वायूची गति आहे तिला सोहं हंस म्हणतात. या गतीच्या वरील भागी शिव आणि खालील भागी जीव आहे. शिवात्मा व जीवात्मा यांमधील पोकळीला, आकाशाला, चिदाकाश म्हणतात. चिदाकाशात ज्या लहरी उत्पन्न होतात ते चैतन्य. चैतन्याच्या लहरी वाढत जाऊन त्याला जे वायूचे स्वरुप येते त्यालाच प्राण म्हणतात. या प्राणापासून भ्रूमध्यापर्यंत येणारी गति म्हणजे प्राणगति. चिदाकाशात जे शीतलत्व आहे. तेच जीवन. याच जीवनकलेवर बाह्यजीवन - श्वासोच्छवास - चालू असतो. साधकाने जीवनाच्या गतीच्या माध्यमावर चित्ताची एकाग्रता व दृष्टीची स्थिरता साधली की जीवनाची वाफ होते व ती ऊर्ध्वगामी होते; तिच्यामुळे भ्रूमध्याच्या ठिकाणी धक्का बसून जीव अंतर्मुख होतो. जीव अंतर्मुख झाला की साक्षिरूप शिवात्मा व जिवात्मा एकरूप होऊन ते परमात्मस्वरूप होतात.



# -- ज्योत चौथी --

## संत – सद्‌गुरु

मुमुक्षूला परमार्थाची वाट दाखवितो तो सद्‌गुरु. सद्‌गुरु म्हणजे ज्याने ही वाट दाखविली तो संत. अशा संताची गाठ पडावयास हवी. संत जगात असतात. परंतु त्यांच्या कपाळावर संत म्हणून शिक्का मारलेला नसतो. संत ही पदवी बाजारात मिळत नाही. कवित्व, कीर्तन, वा चमत्कार करणारा तो संत नव्हे. मग संत ओळखण्याची खूण काय? ज्याच्या दृष्टीत काही उमटत नाही तो संत. काहीच उमटत नाही याचा अर्थ काय? डोळा हा तर आरशाप्रमाणे आहे; त्यात काहीतरी उमटणारच. संतांना आत्मसाक्षात्कार झाला असल्याने, ते सर्वत्र आत्मतत्व अथवा चैतन्य पहात असतात; त्यांच्या दृष्टीत तेच उमटते. सामान्य माणसाच्या दृष्टीतही तेच उमटते परंतु तेथे अज्ञान असते. संतांच्या दृष्टीत उमटलेले चैतन्य ज्ञानपूर्वक असते. संतांना सगळीकडे आत्मचैतन्यच दिसत असते.

## जगात संत कशासाठी?

जेव्हा ईश्वरउपासनेचे सातत्य टिकत नाही असे वाटते तेव्हा तो ओघ चालू ठेवण्यास संत अवतार घेतात. द्वैतातून अद्वैताकडे जाण्याचा मार्ग टिकवून धरण्यास संत अवतार घेतात.

## संतांचा जगातील व्यवहार

सर्वच संत काही संन्यास घेत नाहीत. शुक - वामदेवांसारखे विदेही संत फारच थोडे. लोकांचा उपसर्ग होऊ नये म्हणून काही संत पिशाचवृत्ति धारण करतात. पण बरेचसे संत प्रपंचात रहातात. पण सामान्य माणसापेक्षा त्यांची संसार करण्याची पद्धत निराळी असते. आपण इंटरेस्ट घेऊन संसार करतो.; परंतु संत इंटरेस्ट न घेता संसार करतात. काही कमी पडले

तर ते मिळविण्याची खटपट सामान्य लोक करतात; असली खटपट संत मुळीच करीत नाहीत. जें जे जसे येईल ते ते तसे ते नुसते पहात रहातात. व्यवहारात संत जरी व्यवहारी माणसाप्रमाणे वागताना दिसतात तरी ते व्यवहारात गुंतलेले नसतात. ते संसारात असून नसल्याप्रमाणे असतात; कारण त्यांचें सर्व लक्ष चैतन्याकडे लागलेले असते. जसे डोकीवर पाण्याची घागर घेतलेली स्त्री बोलते, चालत असते, पण तिचे लक्ष घागरीकडे असते, तसे व्यवहारात वागताना संतांचे लक्ष चैतन्यावरच असते. व्यवहा–रात माणूस आघाताला प्रत्याघात करावयाचा या वृत्तीचा असतो, अशी वृत्ति संतांच्या ठिकाणी नसते कारण ते सर्वत्र चैतन्य पहातात; तेंव्हा कुणी कुणावर प्रत्याघात करावयाचा असे त्यांना वाटते. सामान्य माणसे शोक–मोहात समरस होतात. संतांचे तसे नसते. शोकाच्या प्रसंगी हसणे योग्य दिसणार नाही म्हणून ते बाह्यदृष्टचा शोकात दिसतील; आनंदाच्या प्रसंगी रडणे योग्य नव्हे म्हणून ते आनंदी दिसतील; प्रत्यक्ष मात्र ते दोन्हीच्या पलीकडे असतात. त्यांना इतरांप्रमाणे सुखदु:खाचे प्रसंग येतात पण त्यांना सुखदु:खे जाणवत नाहीत. त्यांना ‘ कळो नये सुखदु:ख ’ असे असते. सामान्य माणसांजवळ राग–लोभ असतो, संतांचा रागलोभ नाही म्हणण्याइतका कमी प्रमाणात असतो. संत रागावत नाहीत परंतु त्यांच्या कोशात ‘ राग ’ हा शद्ब मात्र आहे.

संत आपल्या निंदकाचेदेखील वाईट चिंतीत नाहीत. मग ते आपल्या भक्तांचे वाईट कसे करतील? संत जीवाचा काहीतरी फायदाच करुन देतील. नुकसान खास करणार नाहीत.

देह ठेवल्यानंतरही कधी संत वायुरूपाने प्रगट होतात. चिद्वायूला अशक्य काय आहे? वायुरूपातील हे संत दिसतात, कधी त्यांना स्पर्श करता येतो कधी येत नाही. वायु हा जड होऊ शकत असल्याने ही गोष्ट अशक्य नाही.



## सद्गुरू

एकाद्या मुमुक्षूच्या बाबतीत जो संत त्याला परमेश्वरप्राप्तीचा मार्ग दाखवितो तो त्याचा सद्गुरू. सद्गुरू शिष्याला चैतन्याची अनुभूति करून घेण्याचा उपाय सांगतात. सद्गुरू जीवाला त्याचे खरे स्वरूप दाखवून देतात. परमार्थाला आवश्यक ते चंद्रसूर्यात्मक डोळे सद्गुरू साधकाला देतात; चंद्र सूर्य या दोन गति आहेत; त्या सद्गुरू दाखवून देतात. शिष्याला परमात्मदर्शन व्हावे म्हणून सद्गुरू त्याच्यावर अनुग्रह करतात.

## सद्गुरूचा अनुग्रह

सद्गुरूच्या अनुग्रहाचे तीन प्रकार आहेत : (१) कर्णद्वारा (२) दृष्टी-द्वारा (३) स्पर्शद्वारा. कर्णद्वारा हा नेहमीचा राजरोस अनुग्रह आहे. दृष्टिद्वारा म्हणजे सद्गुरूची व शिष्याची दृष्टादृष्ट झाली की शिष्याच्या ठिकाणी ज्ञान प्रगट होते. हा अनुग्रह फार प्रभावी असतो. तिसऱ्या स्पर्श-द्वारा प्रकारात, गुरुंनी स्पर्श केला की विजेचा झटका बसल्याप्रमाणे शिष्याला झटका बसतो; कारण चैतन्याचा प्रवाह गुरूतून शिष्यात संक्रमित होतो, व शिष्याला ज्ञानाची प्राप्ति होते. तिसरा प्रकार क्वचित् आढळतो. दुसरा प्रकार तर फारच क्वचित् दिसून येतो.

## सद्गुरूंचे सत्य स्वरूप

शिष्याने आपल्या सद्गुरूंचे खरे स्वरूप जाणून घेऊन, त्यांची कृपा संपादन करून घेणे हे परमार्थात अत्यावश्यक आहे. सद्गुरूंचे खरे स्वरूप म्हणजे काय ? साडेतीन हात देह व त्यावरील पेहराव म्हणजे सद्गुरू नव्हे. हाडामासांचे शरीर हे गुरूंचे खरे स्वरूप नव्हे. गुरू हे देहातीत असतात; निरूपाधिक जीवन हे त्यांचे स्वरूप. उपाधिभूत जीवनात एकरूप झाल्या-नंतर, नको असलेल्या गोष्टी उपाधिभूत जीवनातून निघून जातात; मग उरते ते निरूपाधिक जीवन; ते गुरूंचे स्वरूप आहे. सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांच्या पलीकडे सद्गुरूंचे खरे रूप आहे. इडा, पिंगला व सुषुम्ना

यांचा संगम ज्याठिकाणी होतो त्याच ठिकाणी गुरूंची वसती असते. चिदाकाशातील तेजोरूप आत्मा म्हणजेच गुरू. सहस्त्रदलस्थानातील सोहंच्या स्वरूपात सद्‌गुरू नटलेले आहेत. सोहंची गति म्हणजे सद्‌गुरूंचे चरण. चैतन्यरूप गुरूंची पाऊले हीही चैतन्यरूप असतात. सद्‌गुरू ब्रह्मरूप आहेत.

## गुरू व शिष्य

खऱ्या गुरूचे अंत करण फार मोठे असते. तो शिष्याला गुरुत्व देतो म्हणूनच तो गुरू. 'शिष्याद् इच्छेत् पराजयम्' असा गुरू असतो. स्वतःच्या शिष्याचा मोठेपणा पाहून त्याला आनंद होतो.

सद्‌गुरूंच्या ठिकाणी शिष्यांबद्दल भेदभाव असतो. असे काहीजणांना वाटते; पण ते बरोबर नाही. जर शिष्य तितक्याच अधिकाराचा असेल तर सद्‌गुरू त्याचेसाठी आपणहून धावत जातात. सद्‌गुरू भक्तांचे रक्षणच करतात; त्यासाठी सद्‌गुरू चमत्कार करतात. ते शिष्याला योग्य मार्गावर आणून आपल्या पदाला नेऊन पोचवतात. शिष्याने आपले अंतःकरण मात्र त्यांना द्यावयास हवे.

## गुरूकृपेचे परमार्थातील महत्त्व

परमार्थाचे शास्त्र गुरूकृपेशिवाय उमगणार नाही. आत्म्याला पहाणे हे वर्मच वेगळे आहे; ते गुरुकृपेविना कळून येत नाही. जीव आणि ब्रह्म एकरूप आहेत हे खरे; पण ते कळण्याला सद्‌गुरूकृपा पाहिजे. चैतन्य हे गुरूकृपेशिवाय दृश्यरूपात येत नाही. आत्मानुभवासाठी गुरूकृपा आवश्यक आहे. चैतन्याच्या अनुभवासाठी उपयोगी पडणारे स्वयंसिद्ध, स्वयंस्फूर्त, व सतत असणारे जे नाम आहे ते गुरूकृपेविना समजून येत नाही, नामगतीवर लक्ष ठेवण्याच्या अभ्यासात राहिल्यावर, सद्‌गुरूंची कृपा जेंव्हा होईल तेव्हाच सोहंरूपाची ओळख होणार आहे. ज्याच्यावर सद्‌गुरूंची कृपा असेल त्यालाच आत्मसुखाचा लाभ होणार आहे. सद्‌गुरूंच्या कृपेविना परमार्थात एक पाऊलदेखील पुढे पडणार नाही.



## गुरूकृपा कशी व केव्हा होते ?

गुरूकृपा ही शिष्याच्या शक्तीने होत नाही. चत्वार देहांचा निरास झाल्याखेरीज गुरुकृपा होत नाही. त्यासाठी शिष्याने साधन केले पाहिजे. स्वतःची बुद्धि न चालविता. सद्‌गुरूंनी सांगितलेल्या साधनाचा अभ्यास व्हावयास हवा. गुरूकृपा होण्यास खडतर साधनाच्या अभ्यासाची आवश्यकता आहे; ती सहजासहजी होत नाही. ज्या प्रमाणात साधनाचा अभ्यास त्या प्रमाणात सद्‌गुरुकृपा होणार. पण एक : कृपा केव्हा होईल याला कालमर्यादा नाही.

कृपा होण्यास गुरुशिष्य समोरासमोर पाहिजेत असे नाही. गुरु उत्तरध्रुवाला व शिष्य दक्षिणध्रुवाला असला तरी गुरुकृपा होऊ शकते. गुरुकृपा ही चीजच निराळी आहे.

# -- ज्योत पाचवी --

## साधन

परमात्म्याच्या प्राप्तीचे साधन सद्गुरू शिष्याला अनुग्रहाद्वारे सांगतात आत्मसुखाच्या प्राप्तीसाठी गुरुकृपा लागते. ती होण्यास शिष्याने गुरूवर दृढ निष्ठा ठेऊन साधनाचा अभ्यास केला पाहिजे. साधन म्हणजे काय ? परमार्थात विशिष्ट धारणा येण्यासाठी काही विशिष्ट प्रक्रिया साधावी लागते. या विशिष्ट प्रक्रियेने सिद्धता करून घेणे यास साधन म्हणतात.

## साधन कशासाठी आवश्यक ?

सहस्रदळस्थानात आत्मसाक्षात्कार होतो. त्यासाठी जीवन हे ऊर्ध्वगामी होऊन भ्रूमध्यात यावयास हवे. ते साधण्यास साधन हवे. शरीरात असणाऱ्या श्वसन, प्राण, व नाम यांच्या गति एका पट्टयात यावयास हव्या. दृष्टीची एकाग्रता व मनाचे तादात्म्य झाले की या गति एक होतात व जीवनाला ऊर्ध्वगामित्व प्राप्त होते. त्यासाठी साधनाची आवश्यकता आहे.

## साधनास आवश्यक गोष्टी

साधनाचा अभ्यास करावयाचा असेल तर स्वस्थ बसले म्हणजे निम्मे साधले. आत्मानुभूति येण्यास स्वस्थता पाहिजे. हाच साधनाचा पहिला अभ्यास आहे. साहजिकच साधकाने प्रमाणाबाहेर व्यायाम करू नयें, जास्त झोपू नये, प्रमाणात बोलावे, व इंद्रियांवर ताबा ठेवावा. पाठ ताठ करून बसल्याशिवाय चित्ताची एकाग्रता होत नाही, मन अंतर्मख होत नाही, साधनात लय लागत नाही. सद्गुरूंनी सांगितल्याप्रमाणेच आस्थेने व तळमळीने साधनाचा अभ्यास केला पाहिजे; साधन करण्याचा निश्चय हवा. सद्गुरूंच्यावर दृढ विश्वास नसेल तर साधनात पुढे पाऊल पडणार नाही, गुरूकृपेने साधन जमते.



## साधनाचे सातत्य

निरखाऱ्याला हात लावला की चटका, असा अनुभव साधनात नाही. अनुभव यायला काही विशिष्ट काळ जावाच लागतो. साधनाला किती वेळ बसले म्हणजे साधन साधता येईल, हे सांगता येत नाही. कदाचित् जन्मभर साधन करूनसुद्धा अनुभव येणार नाही. परंतु हताश होऊन चालणार नाही. एक दिवस साधन, चार दिवस नाही, हे उपयोगी नाही. साधन हा नैमित्तिक अभ्यास नसून नित्याचा अभ्यास आहे. साधनाचा कंटाळा, धरसोड उपयोगी नाहीत. साधनात खंड पडला की पूर्वी केलेले साधन वाया जाते ; म्हणून साधनात खंड पडू देऊ नये. क्रियेला प्रतिक्रिया या न्यायाने साधन करताना अडचणी येतात. त्यांचा प्रतिकार तरी करावा किंवा त्यांचेकडे दुर्लक्ष करावे. साधन जोरात करणे म्हणजेच साधनात येणाऱ्या अडचणींचा प्रतिकार करणे आहे. अडचणी आल्या तरी साधन सोडू नये. साधनाला सुट्टी नाही. जोपर्यंत शरीरात जीवन आहे तोपर्यंत साधनाचा अभ्यास चालू राहिला पाहिजे.

## साधनात काय साधावयाचे ?

साधनात चैतन्याकडे लक्ष असणे हे महत्त्वाचे आहे. जडाकडे, देहाकडे असणारी मनाची ओढ चैतन्याकडे वळविणे म्हणजे साधन आहे. देहाला सुटून राहून चैतन्याकडे लक्ष ठेवण्याचा अभ्यास म्हणजे साधन. साधनाच्या अभ्यासात जितक्या प्रमाणात देहभान कमी तितकी त्यात प्रगति होत आहे असे समजावयास हरकत नाही.

साधन करताना ' मी 'ची जाणीव अथवा अहंकार लयाला गेला पाहिजे. अहंकार हा श्वसनात गतिरूप आहे. उपाधिभूत जीवन शरीराशी तादात्म्य पावले की त्यावर होणारा एक परिणाम म्हणजे अहंकार आहे. श्वसनक्रिया मंद झाली तर अहंकार जातो. अहंकार गेल्याविना खऱ्या साधनास सुरवात होत नाही.

साधनात विचाररहित स्थिति साधावयाची असते. विचार मन करते. मनाचे स्वरूप संकल्प–विकल्पात्मक आहे. साधनात मनाचा लय व्हावयास हवा. मन वायुस्वरूप आहे. त्याचा श्वासोच्छ्वासाशी घनिष्ठ संबंध आहे. श्वासोच्छ्वास स्थिर झाला तर मन स्थिर होते. जेव्हा सद्‌गुरूंनी सांगितलेल्या नाम–गतीचेच फक्त ज्ञान राहून, वृत्ति अंतर्मुख होऊन, त्या गतीवरच अनुस्यूतपणे लक्ष रहाते, चित्ताची एकाग्रता होते, तेव्हा मनातील वावटळ शांत होते. ज्या प्रमाणात चित्ताची एकाग्रता होऊन, मनोलय होऊन, साधनात काळ जाईल त्याप्रमाणात साधनाची पूर्णता होणार आहे.

## वायूचे साधन

दृश्यामध्ये, देहात चिद्वायु अनुस्यूत आहे. साधनामध्ये दृश्य, जड, बाजूस करून, वायूचे साधनानेच वायुरूप परमात्म्यात एकरूप होऊन जावयाचे आहे. म्हणून परमार्थात वायूचेच साधन आहे. वाऱ्याची लहर वाऱ्यात मिसळून टाकणे हेच साधन. चंद्र सूर्य गति एक होण्याचा अभ्यास म्हणजे साधन; साधन हे चंद्रसूर्यगतीच्या संधिकाळात साधावयाचे आहे; त्या संधिकाळातच नाम आहे. श्वासोच्छ्वासात श्वसनाची गति, नामाची गति व प्राणाची गति आहे. चैतन्याच्या प्रवाहावर लक्ष असेल तर या तीन गति एक होतील. या गति एक झाल्याशिवाय साधनाची वाटचाल सुरू होत नाही. श्वासोच्छ्वासावर आयुष्याचे मोजमाप केले जाते. 'आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे.' सच्चिदानंद ही पदवी मिळविण्यास आयुष्याचे – श्वासोच्छ्वासाचे – साधन आहे. शरीरात श्वासोच्छ्वास असेपर्यंत आयुष्याचे साधन साधावयाचे आहे.

प्राण हा पंचप्राणापेक्षा वेगळा आहे; तो वायुरूप असून जीवशिवांचा दुवा आहे. प्राण प्रसन्न झाला तर जीवाला शिवाचे दर्शन होते. प्राण प्रसन्न होण्यास नामाचा अभ्यास, वायूचे साधन आहे. नाम हे वायुरूपच आहे.



जीवनाची गति ऊर्ध्वगामी झाल्याशिवाय आत्मानुभव नाही, हे साधनातील वर्म आहे. साधनाशिवाय स्थिरबिंदुदर्शन होत नाही, आत्मसाक्षात्कार होत नाही.

## सहज साधन

आमच्या चिमडसंप्रदायात भगवान् सद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराजांनी सहजसाधन सांगितले आहे. यात मुद्दाम काहीही करावयाचे नसते; म्हणूनच याला सहजसाधन म्हणतात. सहजसाधनासाठी विशिष्ट प्रकारचे आसन, मुद्रा, इत्यादि पाहिजेत असे नाही. शरीर कोणत्याही स्थितीत असले तरी हे साधन करता येते. माणसाच्या नाकाला सूत लागण्यापर्यंत पाळी आली तरी सहजसाधनात खंड पडू शकत नाही.

सध्या उपाधिभूत जीवनाची बाह्यगति ही वेलांटीप्रमाणे वहाते आहे. सहजसाधनात या अदृष्य गतीवर आपली दृष्टि ठेवावयाची असते, या गतीवर लक्ष ठेवावयाचे असते. त्यामुळे उपाधिभूत जीवनातील स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या देहांचा निरास होतो. स्थूल देह म्हणजे पृथ्वी आणि आप; सूक्ष्म देह तेजोरूप आहे; कारण देह हा वायुरूप आहे, आणि महाकारण देह आकाशरूप आहे. उपाधिभूत जीवनावर चित्ताचे तादात्म्य झाले की त्यातील पृथ्वी, आप, तेज आणि वायु ही तत्त्वे बाजूला होऊन शुद्ध आकाशतत्त्व रहाते; आणि त्यासह जीवनाला ऊर्ध्वगामित्व प्राप्त होते. हे ऊर्ध्वमुख जीवन भ्रूमध्यात येते. येथूनच सहजसाधन सुरु होते. यावेळी सूक्ष्म असा नाद ऐकू येतो; त्यालाच अनाहत म्हणतात. पुढे ओहं, कोहं, सोहं हे ध्वनि ऐकू येतात. याचा अर्थ हे शब्द तेथे कुणी उच्चारत आहे असा नाही; तर या ध्वनीसारखे ध्वनि ऐकू येतात.

अशा प्रकारे चत्वार देहांचा निरास होऊन भ्रूमध्यातून सुरु होणारे हे साधन सहस्रदळात समाप्त होते. मेंदूत जी अंगुष्ठप्रमाण पोकळी आहे

तेथे आत्म्याचे स्थान आहे. या पोकळीला उद्देशूनच 'आकाशात आत्मा आहे' असे म्हटले जाते. येथूनच प्राणाची गति दक्षीणशीखामार्गाने भ्रूमध्यापर्यंत वहात असते व त्याच मार्गाने परत जाते. भ्रूमध्यात ही गति व ऊर्ध्वीभूत जीवनाची गति एक झाली तर सहस्रदळाकडे सरळच जाते त्यांच्या धक्कयाने जीवात्मा अंतर्मुख होऊन शिवाला पहातो; मग शिवात्म्याशी एकरूप होतो आणि नंतर ते दोघेही परमात्मरूप होऊन जातात. अशाप्रकारे सहजसाधन साधकाला अंतिमतत्वापर्यंत पोचविते; सहजसाधन ईश्वर-साक्षात्कारात समाप्त होते.

# – ज्योत सहावी –

## नाम

आत्मसाक्षात्कार शिष्याला व्हावा म्हणून त्याला सद्गुरु जे साधन सांगतात, ते नामाशी संबंधित असते. जीवाशिवाची ऐक्यता होण्यास नामा–शिवाय अन्य काही साधन नाही हे नाम ईश्वराचे आहे. आणि परमेश्वराचे नाम म्हटले की मुखाने राम, कृष्ण, विठ्ठल इत्यादि नावे उच्चारण अथवा नाम–मंत्रांचा जप करणे, अशी सामान्य माणसाची समजूत असते पण ती बरोबर नाही. कारण आत्मसाक्षात्काराला साधनीभूत असणारे नाम हे अगदी वेगळे आहे.

### वाचेने उच्चारित नाम

काही लोक वाचेने-वैखरी वाणीने-नाम उच्चारतात. परंतु अशा नामोच्चाराने आत्मदर्शन होत नाही. केवळ जप करून आत्मसाक्षात्कार झाल्याचे उदाहरण सापडते काय ? नाही. वैखरीने उच्चारलेल्या नामाने परमार्थातील नाद, बिंदु, कला व ज्योति यांचा अनुभव येत नाही. मग हे नाम फुकट जाते काय? नाही. वाचेने नाम घेणे ही परमार्थातील



फार प्राथमिक पायरी आहे. या नामाने जीवाच्या व्यावहारिक जीवनाला ब्रेक ( Brake ) लागतो. त्याचा उपयोग माणसाचा विषय बदलण्याच्या बाबतीत होतो; त्याचे लक्ष थोडेफार व्यवहारातून परमार्थाकडे वळते. या नामोच्चाराने वेळेचा अपव्यय टळतो, मनातील वाईट विचार कमी होतात, मनावर चांगला संस्कार घडतो, आणि पाप जाते म्हणजे चित्तशुद्धी इत्यादि होते; यापलीकडे फारसे साधत नाही. तसे नसते तर, 'श्रीराम जयराम जय जय राम' या मंत्रावर ज्या समर्थ रामदासस्वामींचा भर होता, त्याच समर्थांना 'नाम श्वासोच्छवासी असे' ही गोष्ट सांगावी लागली नसती. याचा अर्थच असा की मुखाने उच्चारलेल्या नामाचा उपयोग वर सांगितलेल्या मर्यादेपर्यंत होतो. पुढे ते नाम सोडून आत्मसाक्षात्कार करून देणाऱ्या नामाकडे वळावयास हवे. नामाचा उच्चार हा फक्त नामाचे खरे स्वरूप काय आहे ही जिज्ञासा उत्पन्न होण्यासाठी आहे. खऱ्या नामाकडे वृत्ति वळावी म्हणून वैखरीने नाम घेण्यास हरकत नाही असे संतांनी सांगितले आहे. चैतन्याच्या अनुभूतीला उपयोगी पडणारे नाम वेगळेच आहे. परमार्थात जड बाजूला सारून, वायूच्या साधनाने वायुरूप परमात्म्याशी एकरूप व्हावयाचे आहे. हे साधन – नाम – हे मुखोच्चारित नामापेक्षा वेगळे असणार हे उघड आहे.

### वायु–गति–रूप नाम

जे नाम खरे म्हणजे संतांनी घेण्यास सांगितले, त्या नामाचा वाणीने प्रत्यक्ष उच्चार करताच येत नाही. नाम म्हणजे चैतन्य आहे. चैतन्याचा उच्चार करता येत नाही. साहजिकच चैतन्यरुप नामाचा तोंडाने उच्चार करता येत नाही. शद्बाची उत्पत्तिच नामात आहे; नाम म्हणजे शद्बाची पराकाष्ठा आहे.

शरीरात नामाचा विशिष्ट ध्वनि ऐकावयास येतो. ज्या नामाचा संतांनी अट्टाहास धरला ते नाम गतिरूप, ध्वनिरूप आहे. 'रामनामाची गति

कोण जाणे रे। जाणताती कैलासपती राणे रे।' या वचनावरून नाम गतिरूप आहे हे कळून येते. ही नामगति बाहेर कुठे नाही. तर 'रामनामगति देहात प्रचीति' या मामामहाराज केळकरांच्या 'रामपाठ' नामक ग्रंथातील चरणावरून, गतिरूप नामाची प्रचीति प्रत्येकाच्या देहातच आहे हे समजून येते. या नामाचा शरीरातील ध्वनि सहज शाहे शरीरात 'रामनाम ध्वनि उमटे' असे वचन आहे. आणि तो ध्वनि ऐकणे हेच नामस्मरण आहे.

## नामाचे सत्यस्वरूप

ज्या नामाने जीव परमात्मरूप होतो, ते नाम म्हणजे चैतन्य आहे. चैतन्य म्हणजेच नाम. नामात परब्रह्म सामावले आहे. नाम हे परमात्म्यापेक्षा वेगळे नाही. नामाचे ठिकाणी परमात्म्याचे रूप बिंबले आहे. म्हणूनच 'नाम तेचि रूप रूप तेचि नाम' असे एकनाथमहाराज म्हणतात. या जगात नामाला रूप आणि रूपाला नाम आहे. परंतु नाम म्हणजेच रूप असे मात्र नाही. परमार्थात मात्र नाम म्हणजेच रूप आहे. परमेश्वर म्हणजे चैतन्य. चैतन्याचा नाद म्हणजे नाम. चैतन्य व चैतन्याचा नाद हे वेगळे नाहीत. चैतन्याचा प्रकाश म्हणजे रूप. म्हणून रूप तेच नाम आहे. नाम वायुस्वरूप आहे. रूप हेही वायुस्वरूप आहे. वायूशिवाय तेजाला, प्रकाशाला अस्तित्व नाही. म्हणून नामातून रूप व रूपातून नाम अशी स्थिति आहे. म्हणून नामात परमात्म्याचे रूप प्रगट होते.

## नामाची साधना

देहात नाम हे जीवनाशी निगडित आहे. 'नाम श्वासोच्छवासी असे।' तरी श्वसन म्हणजे नाम नव्हे ; श्वसन व नाम एक नव्हेत. श्वसनाच्या गतीत नामाची गति आहे. 'नाम श्वासोच्छवासी असे' याचा अर्थ फांदीवर चंद्र आहे, इतपतच. तो संकेत आहे. चंद्र झाडाच्या फांदीवरच आहे हे खरे मानून जरी कोणी जन्मभर फांदीकडे पहात बसला तरी त्याला चंद्र दिसणार



नाही. त्याप्रमाण नाम श्वासोच्छवासात आहे, याचा अर्थ श्वास म्हणजे नाम किंवा उच्छवास म्हणजे नाम असा नाही. तर श्वासोच्छवासात नाम दडलेले आहे. म्हणजे श्वास आणि उच्छवास या दोहोंच्या दरम्यान् जो संधिकाल आहे, त्यात नामाची धारणा आहे. चंद्र–सूर्य–गतीच्या संधिकाळात नाम आहे. श्वासोच्छवासातील संधिकाळात नामाचे साधन साध्य करून घ्यावयाचे आहे. जे नाम श्वास आणि उच्छवास यांच्या मधल्या संधिकाळात आहे, ज्यात परब्रह्म आहे ते नाम खरे नाम आहे. या नामाच्या गतीशी आपण आपली संसरण गति मिळविली की नामस्मरण सुरू झालेच. याच नामस्मरणाचा संतांनी अट्टाहास धरला. हे नामस्मरणच ईश्वरप्राप्तीचे साधन आहे. या नामस्मरणानेच जीव ईश्वरस्वरूप होऊन जातो.

# — ज्योत सातवी —

## साक्षात्कार

जीव मूलतः सच्चिदानंद परमात्मा आहे. पण सध्या तर तो जन्म-मरणाच्या चक्रात व सुखदुःखाच्या फेऱ्यांत सापडला आहे. कारण तो जडाच्या उपाधीत सापडला आहे. आता जीवाने जडउपाधि बाजूस सारून मूळ परमात्मरूप प्राप्त करुन घ्यावयाचे आहे. आत्मदर्शन हे त्याचे ध्येय वा साध्य आहे.

## प्रयत्नाची आवश्यकता

आत्मसाक्षात्काराचे साध्य साधण्यास सद्गुरुंनी सांगितलेल्या नामसाधनाचा अभ्यास साधकाने करावयास हवा. आता कुणीतरी म्हणेल: 'जीव व परमात्मा जर एकच आहेत, तर आत्मरूप होण्यास साधनाचा प्रयत्न कशासाठी ?' याला उत्तर असेः आत्ता जीवाभोवती ज्या उपाधि जमल्या आहेत, त्या दूर करण्यास, त्यांचा निरास करण्यास, प्रयत्न आवश्यक आहे. समजा, एकजण नवकोट नारायण आहे. परंतु त्याच्या संपत्तीवर एक भला मोठा भुजंग बसल्याने त्याला ते द्रव्य आत्ता मिळत नाही. तो भुजंग दूर करण्याची खटपट केल्याविना तो पैसा त्याचा होत नाही. किंवा समजा एकाद्याची एकादी वस्तु त्याच्याजवळच आहे पण ती त्याला सापडत नाही, तोपर्यंत ती त्याची नाही; ती हुडकण्याचा प्रयत्न यशस्वी झाला की ती वस्तु त्याची होते. तसेच परमार्थात आहे. आत्मसाक्षात्कारासाठी प्रयत्न हवा. जो वायूचे साधन करील त्यालाच आत्म्याचे नाद, बिंदु, कला व ज्योति या स्वरूपातील अनुभव येतील-

## आत्मसाक्षात्काराचे स्थान

शरीरातील हृदयपुटात आत्मा समाविष्ट झाला आहे. देहात मेंदूला सहस्रदळ म्हटले जाते; कारण मेंदूला पाकळ्यांप्रमाणे हजारो वळ्या



आहेत. मेंदूच्या ठिकाणी अंगठ्याएवढी पोकळी आहे. या पोकळीलाच हृदय अथवा हृदयाकाश म्हणतात. या हृदयाकाशात आत्म्याचे स्थान आहे; तेथे आत्मसाक्षात्कार होतो. आणि साधकाने सर्वप्रथम आपल्या स्वतःच्या शरीरातच साक्षात्कार साधावयाचा आहे. आत्मसाक्षात्कार हा ज्याचा त्यानेच घ्यावयाचा आहे. प्रयोगशाळेत एकादा मनुष्य दुसऱ्याला प्रयोग दाखवू शकतो. आत्मानुभूतीचे बाबतीत तसे करता येत नाही. आत्मदर्शन हे ज्याचे त्यानेच घ्यावयाचे आहे.

## आत्मसाक्षात्कार म्हणजे काय ?

सद्गुरूंनी सांगितलेल्या नामसाधनाच्या अभ्यासाने जडाचा निरास होऊन चैतन्याचा प्रकर्ष होऊ लागला की साक्षात्कार जाणवू लागतो. चैतन्याची अनुभूति म्हणजे साक्षात्कार. साक्षात् जी वस्तु आहे तिचे दर्शन म्हणजे साक्षात्कार. साक्षात् वस्तु आत्मा आहे. आत्म्याचे दर्शन म्हणजे आत्मसाक्षात्कार. ज्या आत्मा या मूळस्वरूपातून हे विश्व निर्माण झाले त्या मूळस्वरूपाप्रत पोचणे आणि तेच होऊन जाणे म्हणजे आत्मसाक्षात्कार. सर्व जीव आत्मस्वरूपातून निघालेले आहेत. उपाधीमुळे त्यांना आपल्या मूळस्वरूपाचा विसर पडला आहे या विसराचा विसर पाडून आत्म्याला पहाणे म्हणजेच आत्मरूप होऊन जाणे.

आत्मा दिसतो, आत्म्याचे दर्शन होते म्हणजे काय ? आत्मा म्हणून कोणी वरून खाली येऊन आपल्यापुढे उभा रहातो ? तसे नाही. आत्मा दिसतो याचा अर्थ नाद, बिंदु, कला व ज्योति या चार प्रकारांनी आत्म्याचे अनुभव येतात. मूळ नाद आहे; नादातच बिंदु, कला आणि ज्योति असतात. नादाच्या अभ्यासाने नादाचा बिंदु होतो; त्या बिंदूचीच पुढे कला व ज्योति होते. नाद, बिंदु, कला व ज्योति हेच परमार्थातील महत्त्वाचे अनुभव आहेत; या चारांपलीकडे आत्मसाक्षात्कार म्हणून वेगळे काही नाही.

## आत्मदर्शन व दृश्याचे दर्शन

जगातील दृश्य पदार्थांच्या दर्शनापेक्षा आत्मदर्शन हे फार वेगळे आहे. दृश्य व देव वेगळे आहेत. दृश्यामध्ये जे आहे ते साक्षात्कारात नाही. दृश्यासारखा देवाचा अनुभव नाही. व्यवहारात दृश्य पदार्थांना धरुन आपले सुखसमाधान असते; साक्षात्कारात चैतन्याची जाणीव हेच सुखसमाधान. माणूस देहभानावर असताना त्याला दृश्याचे भान होते; याउलट साधकाचे देहभान सुटल्यावर साक्षात्कार होतो. व्यवहारात 'दृश्य' हे पाहिले जाते; तर साक्षात्कारात 'पहाणे' हेच पाहिले जाते. दृश्यात नाम व रुप वेगवेगळे असतात; साक्षात्कारात नाम व रूप एकच असते; नाम तेच रूप आणि रूप तेच नाम हे साक्षात्काराचे वैशिष्टय आहे. दृश्य अंधारात दिसत नाही; साक्षात्कार अंधारात होऊ शकतो. दृश्यात आघाताने नाद होतो व तो बाह्य कानाला ऐकू येतो; कोणत्यातरी प्रकाशाच्या साधनानी प्रकाश होतो व तो बाह्य डोळ्यांनी पाहिला जातो. साक्षात्कारातील नाद हा आघाताविना असतो व तो बाह्यकानाला ऐकू येत नाही. सूर्य, चंद्र इत्यादी प्रकाशाच्या साधनाविना साक्षात्कारात प्रकाश असतो पण तो बाह्यचक्षूला दिसत नाही. साक्षात्कारातला नाद नादानेच ग्रहण केला जातो व प्रकाश हा प्रकाशानेच पाहिला जातो.

## आत्मसाक्षात्काराची प्रक्रिया

चैतन्यापासून जड होते. जसजशी जडाची उपाधि बदलत जाते त्यानुसार त्या त्या उपाधीत सापडलेल्या चैतन्याला शिवात्मा, जीवात्मा इत्यादि नावे दिली जातात. मूळ चैतन्यापासून ज्या क्रमाने जीव सध्याच्या उपाधीत सापडला आहे त्याच्या उलट क्रमाने तो परतला तर तो मूळ आत्मरूपात एकरूप होणार आहे. हा उपाधिबदलाचा क्रम शून्य[1] व गति या दोन शब्दांद्वारे सागता येतो. जेथे एक गति येऊन स्थिरावते, व जेथून दुसरी

[1] संपादकाची टीप : पुढे गति व शून्य दाखविताना गतीसाठी रेघ व शून्यासाठी छोटे वर्तुळ वापरले आहे.



सुरु होते अशी दोन स्थितीमधील अवस्था म्हणजे शून्य होय. या गति आणि शून्ये अशी :-

- बिंदुस्वरूप सच्चिदानंदवायु; निशद्व, परिपूर्ण, निश्चल आत्मा = दोनगति
- केवलशून्य (ब्रह्मरंध्र) -- गति
- निरशून्य (शिवात्मशून्य; निरहंकाराचा नाद) - गति
- शिव (साक्षी) = सोहंगति (भ्रमरगुं ा)
- महाशून्य (औटपीठ) — गति
- जीवात्मशून्य. जीवात्मा = कोहंगति
- अशून्य = रामकृष्णगति, स्फुरण, जीवभाव
- शून्य (गोल्हाट) — गति
- प्रस्फुट गगन (श्रीहाट) = उष्ण व शीत अशा दोन गति
- भूताकाश (त्रिकूट) ≡ ॐकाराच्या तीन गति
- भ्रूमध्य — उपाधिभूतजीवनाची गति, जडाशी संबंधित अशी जीवाची गति श्वासोच्छवास; त्यातच चार देह, मन, चित्त, बुद्धि आहेत.

बिंदुरूप आत्मदर्शनासाठी उपाधिभूतजीवनापासून नामसाधनाची प्रक्रिया सुरू होते. उपाधिभूत जीवनाची म्हणजे श्वासोच्छवासाची गति खालीवर होत आहे. तिच्यावर दृष्टि व कान एकवटून लागले पाहिजेत. परमार्थात कान व डोळे एक झाले पाहिजेत असे म्हणतात. त्याचा अर्थ असा की त्या गतीत श्रवण व दृष्टि ही दोन्ही एकतान पावली पाहिजेत. त्या गतीत काहीही फेरफार न करता तेथे आपले लक्ष केंद्रीभूत करावयाचे आहे. असे केल्याने ती गति हळुहळु संथ होऊ लागते. ही गति संथ झाली की त्यातील चत्वार देहांचा निरास होतो. उपाधिभूत जीवनातील पृथ्वी आणि आप म्हणजे स्थूलदेह, तेज म्हणजे सूक्ष्मदेह; कारणदेह हा वायुरूप आहे, आणि महाकारणदेह म्हणजे आकाश. चत्वारदेहांचा निरास म्हणजे उपाधिभूतजीवनातील पृथ्वी, आप, तेज आणि वायु व आकाश या तत्त्वांचा

निरास. या चार तत्त्वांचा निरास झाला की मग अकुंठित असे शुद्ध आकाशतत्त्व रहाते. या शुद्ध आकाशतत्त्वासह जीवन ऊर्ध्वमुख होते. श्वसन किंवा आकाशतत्त्व ऊर्ध्वमुख होत नाहीत. शुद्ध आकाशतत्त्वासह म्हणजे शद्व या तत्त्वासह जीवन उर्ध्वगामी होते आणि ते भ्रूमध्यात येते. तेथे त्याची प्राणाच्या गतीशी गाठ पडते. नंतर एकरूप झालेल्या या दोनगति-ज्या आत्म्याला पहाण्यास डोळयाचे काम करतात-वर वर जात आत्म्यापर्यंत पोचतात. तेथे जीव आत्मरूप होऊन जातो.

## साक्षात्काराचा प्रारंभ

ऊर्ध्वगामी झालेले जीवन प्रथम त्रिकूटस्थानी येते. त्रिकूटस्थानात येऊन जीव निवांत झाला की तेथेच 'गंगा'- स्नान आहे. ही गंगा बाहेरची नव्हे. ही गंगा म्हणजे निळया रंगाची जीवनकळा आहे. त्रिकूटस्थान ओलांडल्यावर तुर्या अवस्थेचा अनुभव येतो तुर्या ही जागृति, स्वप्न व सुषुप्ति यानंतरची अवस्था आहे. ही जागृति म्हणजे आत्म्याचे अखंड स्मरण. स्वप्न म्हणजे प्रस्फुस्टगगनाच्या ठिकाणी येणारा अनुभव, आणि निद्रा म्हणजे ज्ञानपूर्वक अहंकाराचा लय. निद्रेपलीकडील तुर्याअवस्थेत चैतन्याची ओळख होते; तुर्यावस्था म्हणजे प्रस्फुटगगनाचा शेवट. तुर्येनंतर उन्मनी अवस्था येते. ज्या शून्यापासून प्रस्फुटगगन निर्माण झाले त्याच्याशी अभेद स्थिति म्हणजे उन्मनी.

## साक्षात्कारातील नाद

आत्मा हा नाद. बिंदु, कला, व ज्योति या चार प्रकारांनी अनुभवाला येतो. हा नाद चैतन्याचा असतो; तो आघाताविना असल्याने त्याला 'अनाहत' म्हणतात. चिमडसंप्रदायाचे प्रवर्तक रामभाऊमहाराज यरगट्टीकर यांनी आपल्या पंचपदीतील एका पदात 'घंटा किंकिणी नादं सिंहं शंखंनादं, भेर्यादिक महनादं' असे काही नादाचे अनुभव सांगितले आहेत. हे नाद नादानेच ग्रहण केले जातात.



## साक्षात्कारातील बिंदु

नादाचाच बिंदु होतो. सोहंरुप म्हणजे बिंदु. आत्मा बिंदूएवढाच आहे. निश्चळ चैतन्य म्हणजे सोहं. सोहं हंस हा परमार्थाचा सोलीव गाभा आहे. हे आत्मस्वरूप खसखशीएवढे आहे; पण त्यात लाखो कोटी सूर्यांचे तेज गडप होऊन जाते; हे तेज उष्ण नसून चंद्राप्रमाणे शीतल आहे. जेव्हा नाम-गति व प्राणगति एक होतात, शरीराचे आकर्षण नाहीसे होते, मन संकल्पविकल्परहित होते, मनाचे मनत्व उरत नाही, तेव्हा या स्थिरबिंदूचे दर्शन घेण्यास समर्थ असा, बाह्य डोळयांपेक्षा वेगळा असा, तिसरा डोळा उघडतो; हा डोळा भ्रूमध्यात आहे; या डोळयाने स्थिरबिंदूचे दर्शन होते.

## साक्षात्कारातील प्रकाश

नाद आणि प्रकाश या स्वरूपात आत्म्याचा साक्षात्कार होतो. साक्षात्कारामध्ये विविध रंगाचे प्रकाश दिसतात. चिमडच्या रामभाऊमहाराज यरगट्टीकरांनी म्हटल्याप्रमाणे, 'दृष्टवा दृश्यं व्योमं पीतं शुभ्रं, ताम्रं नीलं धवलं श्यामं अभिनव नवरंगं' असे नानारंगी प्रकाश दिसतात. हे प्रकाश प्रकाशानेच ग्रहण केले जातात हे प्रकाश तेजस्वी व लखलखीत असतात, पण उष्ण नसून शीतल असतात.

प्रथम रक्त रंगाचा प्रकाश दिसतो; तो पेटल्या निखाऱ्याप्रमाणे लालबुंद असतो. मग श्वेत प्रकाशाचे दर्शन होते. नंतर दिसणारा श्याम रंगाचा प्रकाश हा तुकतुकीत काळा असतो. त्याचेनंतर नीलप्रकाश दृग्गोचर होतो. नील प्रकाशात साक्षत्काराचा शेवट होतो.

अशा प्रकारे आत्मस्वरूपाकडे जाणाऱ्या मार्गावर, नाद, बिंदु, कला आणि ज्योति यांचे अनुभव घेत घेत, जीवाचा परमार्थाचा प्रवास परमात्म्यापाशी संपतो आणि तो परमात्मरूप होऊन जातो.